International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.19 July – Aug 2022

# महात्मा बसवेश्वरांचे मानव समाजासाठी केलेले योगदान

प्रा. डॉ. सोमगोंडे निंगप्पा सिद्राम
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, जवाहर कॉलेज अणदूर, ता.तुळजापूर
*Corresponding Author*- प्रा. डॉ. सोमगोंडे निंगप्पा सिद्राम
ईमेल- snsa1966@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7053681

**प्रस्तावना -**

कर्नाटक भूमी बसवेश्वरांच्या चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेले आहे बाराव्या शतकात ... वरांनी जे क्रांतिकारक कार्य केले आणि त्या कार्याला ची वैचारिक बैठक पुरवली तिचा उहापोह बसवेश्वरयांनी व्यक्त केलेल्या धार्मिक सामाजिक आर्थिक व राजकीय विचारांच्या अनुषंगाने केलेला आहे समाज प्रबोधन कार्य या अर्थाने बसवेश्वर यांचा अभ्यास केल्यास त्यांच्या सामाजिक कार्याचा आणि त्यांनी उभ्या केलेल्या सामाजिक चळवळीचा आपणास आढावा घ्यावा लागेल. ब्राह्मण कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म होऊनही त्यांनी वर्णव्यवस्था आणि त्यासंबंधाने अस्तित्वात असलेल्या जातिव्यवस्थेवर आणि जातीव्यवस्थेची संबंधित असलेला श्रेष्ठ-कानिष्ठतेच्या पद्धतीवर प्रखर टीकेचे प्रहार केले जाती जातीमधील भेदाची भिंत त्यांनी पाडून समतेच्या मूल्यावर अधिष्ठित असलेली समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सामाजिक चळवळ घडवून आणली प्रबोधनकारांच्या भूमिकेतून त्यांनी धर्माच्या माध्यमातून समाजाचे सामाजिक समतेची शिकवण दिली तिचे महत्त्व आज देखील जाणवते बाराव्या शतकात प्रबोधनाचे साधन धर्मच होता मानवी समूहाला संघटित करणारे आणि मानवी जीवनाची दिशा ठरवणार एक प्रभावी साधन म्हणून धर्म अस्तित्वात आलेला आहे परंतु कालौघात धर्म हेच मानवी जीवनाचे ध्येय झाले धर्मासाठी माणूस आणि धर्माच्या अस्तित्वासाठी माणूस हा विचार रूड झाल्यानंतर धर्माच्या अस्तित्वाच्या संदर्भातच मानवी अस्तित्वाचा शोध देण्या घेण्याचा प्रयत्न धर्ममार्तंडांनी सुरू केला त्याचा हिंसात्मक अविष्कार धर्मासाठी युद्ध धर्मासाठी लढली गेलेली युद्धे ही वस्तुतः माणुसकीच्या मूल्याचा प्रेतावरून निघालेली धर्माचे मिरवणूक असल्याचे इतिहासच सांगतो.

**उद्दिष्टे –**

1. महात्मा बसवेश्वरांनी मांडलेल्या विचाराचा समाजावर कितपत प्रभाव पडला हे पाहणे.
2. बसवेश्वरांच्या विचारामागे जी उद्दिष्टे होती ती कितपत सद्यझाली त्याचे अवलोकन करणे.

**कार्यक्षेत्र –**

समता आणि कार्मवादाची मांडणी करणारे अनेकजण असले तरी माझा संशोधन विषय फक्त "महात्मा बसवेश्वर एक चिंतन" या विषयावर प्रकाश टाकतो. बसवेश्वर कालखंडातील बरेच ऐतिहासिक पुरावे बसवन बागेवाडी मंगळवेढा बसवकल्याण आणि पुडलसंगम या त्यांच्या कार्य भूमीमध्ये आढळून येत नाहीत.

**वर्ण व्यवस्था आणि जातीव्यवस्थेला प्रखर विरोध –**

वस्तूचा धर्म हा माणसासाठी असून माणुसकीच्या व मानवतावादी मूल्याच्या प्रतिष्ठापनेसाठी धर्म प्रयत्नशील असतो धर्माची प्रेरणा व्यक्तीच्या अंतरीक जीवन व बाह्य जीवन समृद्ध व विकसित करणारी आहे अध्यात्माची प्रेरणा ही आत्मविसर्जनाची आणि अरिहंत होण्याची प्रेरणा आहे महात्मा बसवेश्वरांनी आपल्या विचाराचा केंद्रबिंदू माणूस गृहीत धरलेला होता त्या गृहीतकास केंद्रस्थानी कल्पना त्यांनी आपल्या धार्मिक सामाजिक आर्थिक आणि राजकीय विचारांची मांडणी केलेली आहे म्हणून जातीय व्यवस्था आणि वर्णव्यवस्थेने व त्या संबंधात विकसित झालेल्या रूढी व परंपराने रूढ झालेल्या माणसाला मुक्त करण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केलेला आहे त्याची सामाजिक परिवर्तनाची चळवळ ही मुख्यतः माणूस परिवर्तनाची चळवळ होती. माणूस नावाचा प्राणी अमुलाग्र बदलण्याच्या हेतूनेच त्यांनी धर्म माध्यमाद्वारे केलेला प्रयत्न स्पृहणिह आहे शिवोपासना इष्टलिंग धारण करणे अष्टवर्ण व पंचाचार हे व्यक्तिमध्ये परिवर्तन घडवून आणणारे सन्मार्ग आहेत हे सांगून त्यांनी आपल्या भक्तिपंथात अनेकांना सामावून घेतले त्यांनी

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist.


107B

सांगितलेला धर्म हा मानवधर्म असून तो सामान्य माणसाचा किंबहुना सर्वांचा आहे. बसवेश्वरांनी वीरशैव-धर्मामधील सिद्धांतांना बदललेल्या परिस्थितीच्या संदर्भात नवीन अर्थ प्राप्त करून दिला प्रवृत्ती वाद आणि निवृत्ती वादाचा झालेला अतिरेक विचारात घेऊन या दोन्ही विचार प्रवाहामध्ये समन्वय घडवून आणून उच्चत्तम स्वच्छ गृहस्थी धर्माचा पुरस्कार केला परमेश्वर प्राप्ती जरी प्रत्येक भक्ताचे जीवन ध्येय असले तरी परमेश्वराची अस्तित्व हे सर्वव्यापी असून तो सामान्यजन्य आणि सर्व जीवसृष्टीमध्ये व्यापलेला आहे म्हणून समाजसेवा हीच ईश्वरसेवा होय असे बसवेश्वर म्हणतात.

**मानवतावादी मूल्यांची स्थापना -**

बसवेश्वरांच्या समाजसेवेचे स्वरूप हे अधिकांश आधुनिक असून प्रस्थापित जातीय व्यवस्थेला छेद देणारे असून सामाजिक समतेचे मूल्य जोपासणारे व समाज जीवनात ते मूल्य प्रस्थापित करणारे आहे म्हणूनच त्यांनी जातीय अहंता व त्यासंबंधी श्रेष्ठत्वाच्या व कनिष्ठत्वाच्या विचाराला विरोध दर्शविला आंतरजातीय संबंध वाढविण्यासाठी सहभोजन व आंतरजातीय विवाह घडवून आणणारे बसवेश्वर हे आधुनिकतिचा उत्कृष्ट नमुना आहेत. आधुनिकता ही मानवी मनाशी समाजाच्या मानसिकतेशी संबंधित असून स्थितीशिलता सनातनवाद व प्रतिगामित्वाला विरोध दर्शविणारी मानवी मन मुक्त करणारी विचार प्रेरणा आहे.

**आधुनिक पुरोगामी विचारप्रणाली समाजात रुजवली**

सामाजिक परिवर्तन हे समाजजीवनाच्या सर्वच अंगांना स्पर्शणारे असावे लागते सामाजिक परिवर्तनामध्ये समाजामधील सर्व स्तरांमध्ये लोकांचा अंतर्भाव होत असतो बसवेश्वरांनी तो गृहीत धरून सर्वसामान्यांना समजेल अशा बोली भाषेत आपल्या तत्वज्ञानाची व जीवनातील अनुभवाची मांडणी केली बसवेश्वरांच्या सामाजिक क्रांतीचे स्वरूप सार्वजनिक व सर्वक्षेत्रीय आहे समाज परिवर्तनाच्या संदर्भात त्यांनी समाजाला केवळ पारमार्थिक जीवनाचा विचार केलेला नाही मानवी जीवनाचा विचार देखील केलेला आहे समाजाच्या आर्थिक स्वावलंबनाचा विचार गृहीत धरून काय कवे कैलास या सिद्धांताची मांडणी केली कायकवे कैलास चा सिद्धांत व्यक्ती जीवनाशी व सामाजिक जीवनाशी संबंधित असून या सिद्धांताला नैतिक अधिष्ठान असल्याने संपत्तीबाबत असणारा प्रत्येक माणसाचा दृष्टिकोन ही निशुद्ध नैतिक असला पाहिजे ही शिकवण त्यांनी समाजाला दिली त्याचा परिणाम म्हणून समाजात होणारे आर्थिक शोषण थांबते शोषण विरहित समाजाचे ध्येय साध्य करण्याचा हा एक वेगळा प्रयत्न होता.

**सामाजिक न्यायासाठी शून्य पीठाची स्थापना -**

बसवेश्वरांनी अनुभव मंडपाची स्थापना करून तात्विक व्यवहारिक चर्चेसाठी एक मुक्तपीठ लोकांना उपलब्ध करून दिले अनुभव मंटपाला शून्यपीठही म्हटले जाते या पिठामध्ये सहभागी होणारी प्रत्येक व्यक्ती ही अरिहंत होती तिथे घडणारी तात्विक चर्चा आणि अध्यात्म मार्गातील प्रत्येकाचे आत्मकथनी लक्षात घेतल्यास ते वैचारिक प्रक्रिया घडविणारे अध्यात्मिक केंद्र होते हे कोणीही नाकारू शकणार नाही बसवेश्वरांना अभिप्रेत असलेला समाज हा एक आदर्श समाज आहे.

जो वर्गविरहित वर्ण व जाती शोषण विरहित स्वतंत्र समानतेच्या तत्वावर अधिष्ठित बंधुत्वाच्या भावनेने बांधला गेलेला सामाजिक न्यायासाठी सिद्ध असलेला समाज आहे वरील देहासाठी त्यांनी केलेल्या तत्त्वज्ञानाची व जीवन व्यवहाराची मांडणी परस्पर संबंधित परस्पर पूरक मूल्याची असून त्यामध्ये आंतरिक तणाव निर्माण होत नाहीत बसवेश्वरांच्या कार्याचा विचार होत असताना त्यांचा वैचारिक वारसा चालविणाऱ्या अनुयायाचा वर्ग आणि परंपरा यांचे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विवेचन करावे लागेल.

**सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभारली -**

12 व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी एक प्रखर बौद्धिक परंपरेचा पाया घातला आणि त्यासाठी त्यांनी हौतात्मम्य पत्करले परंतु ती परंपरा स्थितीशील समाजात टिकून राहिली नाही बसवेश्वरांनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेचे एक गतिशील प्रवाही आदर्श समाज निर्माण करण्याच्या हेतूने ज्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली त्या तत्वज्ञानाचा पाठपुरावा करणारा त्याची अंमलबजावणी करणारा अनुदयांचा वर्ग नंतरच्या काळात निर्माण झाला नाही हे दुर्दैव आहे कोणत्याही समाजात नवविचार रुजविण्यासाठी त्या विचाराचे प्रेरित झालेली अनुदयाची फौज असावी लागते आणि त्या विचाराचा वारसा पुढील पिढीकडे सोपून प्रसंगी त्या विचारात गरजेनुसार आणि बदलत्या परिस्थितीनुसार नवीन विचारांची भर टाकावी लागत असते बसवेश्वरनंतर विचार संक्रमणाची प्रक्रिया थंडावल्याचे दिसते सनातन व्यवस्थेमधील अनेक अनिष्ट प्रवाहांनी प्रवेश केला जंगम गुरु पिठाधिपती यांनी आपली स्थानी

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

अधिक भक्कम करून त्या भोवती वैयक्तिक स्वार्थाची भक्कम तटबंधी उभारली, जंगम ही संकल्पना महात्मा बसवेश्वरांनी ज्या हेतूने व अर्थाने मांडली नंतरच्या काळातील वेगळा अर्थ व असे प्रस्थापित गुरु मंडळींनी दिला जंगम आणि व्यक्तिगत मालकीची मठसंस्था उभारली आणि ज्या मठात पूर्वी धार्मिक चर्चा होत असे ते व्यसनाधीन लोकांचे आश्रयस्थान झाल्याच्या आढळते बसवेश्वरांच्या निवासामधील आधुनिकता व्यापकता त्यांचा वारसा सांगणाऱ्या नंतरचे पिढीतील अनुयायांना लक्षात आली नाही प्रसंगी काही अपप्रवाह निर्माण झालेले असतीलही परंतु तो ठप्प झालेला नाही वीरशैव पंथातील अनुयायांनी बसवेश्वरांच्या विचारपरंपरेला त्यांच्या कृतिशीलतेला खंडित केलेले आहे असे खेदाने म्हणावे वाटते यात महापुरुषाचा दोष नसतो. त्या महापुराषांना समजून घेण्याची क्षमता तुम्हा-आम्हास नसते. हे त्या महापुराषाचे दुर्दैव होय.

**सारांश –**

करून हा सर्वच धर्माचा आत्मा आहे. हे तत्व या दोघांनी स्वीकारले. विचार, अभिव्यक्ती आणि कृतीस्वातंत्र्याचा विचार त्यांनी सर्व सामान्य माणसाला सांगितला आणि सर्वसामान्य मानासाला अज्ञानाच्या आणि अंधश्रधेच्या बंधनातून मुक्त करून त्यांना माणूस म्हणून जगण्याचा नैसर्गीक अधिकार बहाल केला. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात व कार्यात स्त्रियांना पुरषाइतका समान अधिकार मिळवून दिला आणि धर्म कार्यात त्यांना सहभागी करून घेतले.

**संदर्भ ग्रंथ –**

1. डॉ. के. आर. बसवराज –बसवेश्वर धारवाड
2. डॉ. शकुंतला भूसनुरमठ – शरण साहित्य
3. बसव समिती - बेंगलोर

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad